देशदूत

# बाळासाहेब वाघ गुणवत्तावाढीसाठी आग्रही : थोरात

नाशिक । दि. २० प्रतिनिधी




कै. बाळासाहेब वाघ यांचा शैक्षणिक गुणवत्ता वाढीसोबतच विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यावर नेहमी भर होता. कृषी अभ्यासक्रम व कृषी क्षेत्र हे त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय होता. त्यांच्या पाठपुराव्यामुळे राज्यातील कृषी महाविद्यालयांचा दर्जा वाढला असल्याचे मत माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केले. के. के. वाघ शिक्षण संस्था, स्माईल व स्पिनॅच संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब (भाऊ) देवराम वाघ यांची ११ व्या जयंती कार्यक्रमात थोरात बोलत होते.

याप्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, स्माईल आणि स्पिनॅच संस्थेचे सचिव अजिंक्य वाघ, विश्वस्त शकुंतला वाघ, मेट संस्थेच्या विश्वस्त शेफाली भुजबळ, आमदार दिलीप बनकर, डॉ. राहुल आहेर, सत्यजित तांबे, माजी आमदार अनिल कदम, मविप्र सरचिटणीस ड. नितीन ठाकरे, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, मविप्र माजी सरचिटणीस निलीमा पवार, माजी नगरसेवक, विविध क्षेत्रातील मान्यवर आदी उपस्थित होते. पुणे येथून बीएससी अॅग्री शिक्षण पूर्ण करून बाळासाहेबांनी कामकाजाची वाटचाल सुरू केली. आयुष्य कसे जगावे? याचे मुर्तीमंत उदाहरण ते होते. त्यांचे जलसंधारण क्षेत्रात मोठे काम होत. निफाड तालुक्यातील कर्मवीर बंधाऱ्यांची निर्मिती त्यांच्याच काळातील आहे. आदर्श व्यक्तिमत्व म्हणून भाऊंचे कार्य नेहमीच स्मरणात राहिल, असे थोरात यांनी सांगितले.

यावेळी विविध मान्यवरांनी बाळासाहेब वाघ यांच्या आठवणींना उजाळा देत मनोगत व्यक्त केले. मान्यवरांच्या हस्ते ध्यासपर्व या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रम ऑफलाईन व ऑनलाईन दोन्ही स्वरूपात पार पडला. प्रत्यक्ष कार्यक्रमात दोन हजार मान्यवर तर ऑनलाइन नऊशेहून अधिक मान्यवर उपस्थित होते.

सकाळ

# बाळासाहेब वाघ यांच्या योगदानाने वाढला दर्जा

## माजी मंत्री थोरात : (कै.) बाळासाहेब वाघ जयंतीनिमित्त कार्यक्रम

▸ सकाळ वृत्तसेवा

नाशिक, ता. १९ : (कै.) बाळासाहेब वाघ यांनी शैक्षणिक गुणवत्तावाढीवर नेहमीच भर दिला. बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यावर त्यांचा कायम कटाक्ष राहिला. कृषी अभ्यासक्रमाबाबत ते विशेष जागरूक होते. त्यांनी केलेला पाठपुरावा आणि योगदानामुळेच राज्यातील कृषी महाविद्यालयांचा दर्जा वाढल्याचे प्रतिपादन माजी महसूलमंत्री आमदार बाळासाहेब थोरात यांनी गुरुवारी (ता. १९) केले.

कर्मवीर काकासाहेब वाघ शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित (कै.) बाळासाहेब वाघ जयंती कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर आमदार सत्यजित तांबे, नीलिमाताई पवार, शकुंतलाताई वाघ, शेफाली भुजबळ, माजी आमदार अनिल कदम, 'मविप्र' अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, स्माईल आणि स्पिनॅच संस्थेचे सचिव अजिंक्य वाघ, शाहू खैरे, राहुल दिवे आदी उपस्थित होते. पुणे येथे उच्चशिक्षण घेऊन बाळासाहेबांनी वाटचाल केली. आयुष्य कसे जगावे, याचे मूर्तिमंत उदाहरण बाळासाहेब वाघ. जलसंधारण क्षेत्रात त्यांनी मोठे काम उभे केले. आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणून भाऊंचे कार्य नेहमीच स्मरणात राहील, असे थोरात यांनी सांगितले.

भाऊंनी आयुष्यभर काम केले. कोणत्याही संस्थांमध्ये महिलांना सुरक्षितता देणे, बारीक अवलोकन करणे, सातत्याने बैठक घेऊन अपडेट राहणे, हे त्यांचे गुण अंगीकारण्याची गरज आहे. ते स्वतः एक विद्यापीठ होते, असे 'मविप्र'च्या माजी सरचिटणीस नीलिमाताई पवार यांनी सांगितले.



नाशिक : (कै.) बाळासाहेब वाघ जयंतीनिमित्त गुरुवारी झालेल्या कार्यक्रमात बोलताना बाळासाहेब थोरात.

### जागतिक पातळीवरील विद्यापीठ : आमदार तांबे

■ काही लोक जन्माला येतात आणि कर्तबगारी दाखवितात. भाऊंनी संधीचे सोने करीत शैक्षणिक वटवृक्ष उभा केला. बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा निर्माण केल्या. त्यांच्या कामातील सातत्यामुळे संस्थेच्या माध्यमातून जागतिक पातळीवर विद्यापीठ उभे करण्यात यश आल्याचे विधान परिषदेचे आमदार सत्यजित तांबे यांनी सांगितले.

Nashik, Main
20/10/2023 Page No. 8

पुढारी

# बाळासाहेब वैचारिक विद्यापीठ : थोरात

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

बाळासाहेब वाघ यांच्याशी फार कमी संपर्क आला तरी कृषिमंत्री असताना त्यांनी मांडलेल्या सूचना, शासनाने काय केले पाहिजे, त्यांची मुद्दे मांडण्याची पद्धत, स्पष्टवक्तेपणा, पटवून देण्याची ठोस पद्धत यामुळे राज्यातील कृषी महाविद्यालयांचा दर्जा वाढला. जीवनात कसे असावे याचे मूर्तिमंत उदाहरण बाळासाहेब वाघ असल्याचे प्रतिपादन माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले.

क. का. वाघ शिक्षण संस्था, स्माइल व स्पिनॅच संस्था आयोजित बाळासाहेब वाघ यांच्या ९१व्या जयंतीनिमित्ताने अभियांत्रिकी महाविद्यालयात ते बोलत होते. थोरात म्हणाले, बाळासाहेब वाघ यांचा बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यावर नेहमीच कटाक्ष होता. आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणून भाऊंचे कार्य नेहमीच स्मरणात राहील, असे शेवटी ते म्हणाले.

व्यासपीठावर आ. सत्यजित तांबे, शेफाली भुजबळ, माजी आमदार अनिल कदम, नीलिमा पवार, शकुंतला वाघ, मविप्र अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, स्माइल आणि स्पिनॅच संस्थेचे सचिव अजिंक्य वाघ, माजी नगरसेवक राहुल दिवे, शाहू खैरे उपस्थित होते. मविप्रच्या माजी सरचिटणीस नीलिमा पवार म्हणाल्या, कोणत्याही संस्थेमध्ये महिला सुरक्षित असणे महत्त्वाचे असे बाळासाहेब नेहमी म्हणत असत. कर्म धुरंधर असल्यासारखे त्यांनी नेहमी झपाटल्यासारखे काम केले. संस्थेत सातत्याने बैठका घेऊन ते सर्वांना अपडेट करत असत. स्वाती पवार यांनी सूत्रसंचालन केले.




**नाशिक : 'ध्यासपर्व' स्मरणिका प्रकाशनप्रसंगी शेफाली भुजबळ, आ. सत्यजित तांबे, शकुंतला वाघ, समीर वाघ, बाळासाहेब थोरात, अनिल कदम आदी. (छाया : हेमंत घोरपडे)**

### जागतिक विद्यापीठ उभारले

बाळासाहेबांनी बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा निर्माण केल्या. भाऊंनी संधीचे सोने करत शैक्षणिक वटवृक्ष उभारला. त्यांच्या कामातील सातत्यामुळे संस्थेच्या माध्यमातून जागतिक पातळीवर विद्यापीठ उभारण्यात बाळासाहेब वाघ यांचा मोठा वाटा असून, आता संस्थेतील प्रत्येक माणसावर ती जबाबदारी असल्याचे मत आ. सत्यजित तांबे यांनी मांडले.

Nashik Edition
Oct 20, 2023 Page No. 12
newspaper.pudhari.co.in

# बाळासाहेब वाघ कर्मयोगी

## काँग्रेसचे ज्येष्ठ नेते थोरात यांचे प्रतिपादन

म. टा. प्रतिनिधी, नाशिक




'आमचे भाऊ अर्थात, बाळासाहेब वाघ हे गुणवत्तेची जोपासना करणारे कर्मयोगी होते. त्यांचा पाठपुरावा आणि योगदानामुळे राज्यातील कृषी महाविद्यालयांचा दर्जा उंचावला,' असे प्रतिपादन काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी केले.

के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित बाळासाहेब वाघ जयंती कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर आमदार सत्यजित तांबे, नीलिमा पवार, शकुंतला वाघ, शेफाली भुजबळ, माजी आमदार अनिल कदम, मविप्रचे अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, स्माइल अनि स्पिर्नचे संस्थेचे सचिव अजिंक्य वाघ, माजी नगरसेवक राहुल दिवे, शाहू खैरे आदी उपस्थित होते.

पुणे येथे उच्च शिक्षण घेऊन बाळासाहेबांनी स्वानुभवातून वाटचाल केली. आयुष्य कसे जगावे, याचे ते मूर्तिमंत उदाहरण होते. जलसंधारण क्षेत्रातही त्यांचे मोठे काम होते. कर्मवीर बंधाऱ्यांची निर्मिती त्यांच्याच काळातील आहे. आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणून भाऊंचे कार्य नेहमीच स्मरणात राहील, असे थोरात यांनी सांगितले. भाऊंनी आयुष्यभर काम केले. खऱ्या अर्थाने ते कर्मधुरंधर ठरले. कोणत्याही संस्थांमध्ये महिलांच्या सुरक्षेवर त्यांचा कटाक्ष राहिला. त्यांचे गुण अंगिकारण्याची गरज आहे. ते स्वतः एक विद्यापीठ होते, असे नीलिमा पवार यांनी सांगितले.

### 'कामातील सातत्यामुळे यश'

काही लोक जन्माला येतात आणि कर्तबगारी दाखवतात. भाऊंनी संधीचे सोने करीत शैक्षणिक वटवृक्ष उभा केला. बहुजन समाजातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सुविधा निर्माण केल्या. त्यांच्या कामातील सातत्यामुळे संस्थेच्या माध्यमातून जागतिक पातळीवरील विद्यापीठ उभे करण्यात यश आल्याचे आमदार सत्यजित तांबे यांनी सांगितले.

Maharastra times 20-10-2023

# कृषी महाविद्यालयांचा दर्जा वाढविण्यात बाळासाहेब वाघ यांचे योगदान : थोरात

## जयंती सोहळ्यात प्रतिपादन

प्रतिनिधी | नाशिक

स्व. बाळासाहेब वाघ यांनी शैक्षणिक गुणवत्ता वाढीवर भर दिला होता. तबहुजन समाजातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यावर कटाक्ष होता. कृषी अभ्यासक्रमांबाबत ते सतर्क होते. त्यांच्या पाठपुराव्यामुळे कृषी महाविद्यालयांचा दर्जा वाढल्याचे प्रतिपादन माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले.

के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात आयोजित स्व. बाळासाहेब वाघ जयंती कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर आ. सत्यजित तांबे, नीलिमा पवार, शकुंतला [illegible] भुजबळ, माजी आ. अनिल कदम, डॉ. सुनील ढिकले, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, स्माईल आणि स्पिनॅच संस्थेचे सचिव अजिंक्य वाघ, राहुल दिवे, [illegible] शिक्षण घेऊन बाळासाहेबांनी आयुष्य कसे जगावे याचे उदाहरण घालून दिले. कर्मवीर



व्यासपर्व विशेषांकाचे प्रकाशन करताना माजीमंत्री बाळासाहेब थोरात. समवेत मान्यवर

### जागतिक पातळीवरील विद्यापीठ

काही लोक जन्माला येतात आणि कर्तबगारी दाखवतात. भाऊंनी संधीचे सोने करत शैक्षणिक संस्थेचा वटवृक्ष उभा केला. बहुजन समाजातील विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार शैक्षणिक सुविधा निर्माण केल्या. त्यांच्या कामातील सातत्यामुळे संस्थेच्या माध्यमातून जागतिक पातळीवर विद्यापीठ उभे राहिल्याचे आ. सत्यजित तांबे यांनी सांगितले.

Divya Marathi today

बंधाऱ्यांची निर्मिती त्यांच्या काळाती[illegible] आहे. आदर्श व्यक्तिमत्त्व म्हणून भाऊं[illegible] कार्य नेहमीच स्मरणात राहील, असे थोर[illegible] यांनी सांगितले. स्वत:ला अपडेट ठेवत [illegible] त्यांचे गुण अंगीकारण्याची गरज नीलि[illegible] पवार यांनी व्यक्त केली.

नाशिक

[illegible] अधिकारी,

लोकमत

के.के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक,
स्माईल व स्पिनॅच संस्था यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित
कै. बाळासाहेब देवराम वाघ (भाऊ)

प्रेरणास्थान



कर्मवीर कै. देवराम सयाजी वाघ

# ९१ वी जयंती कार्यक्रम

जयंती निमित्त...



कोटी-कोटी प्रणाम !

के. के. वाघ शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष व महाराष्ट्रातील विनाअनुदानित अभियांत्रिकी, तंत्रनिकेतने, कृषी व कृषी संलग्न महाविद्यालये या तीनही असोसिएशनचे माजी अध्यक्ष, द्रष्टे ज्ञानयोगी, उच्च व तंत्रशिक्षणामध्ये क्रांती करणारे तसेच दर्जा, मूल्य व नैतिक परंपरा यांचा अहोरात्र ध्यास धरणारे उत्तुंग व्यक्तिमत्त्व! ह्या महनीय कर्मयोग्याची ९१ वी जयंती साजरी करण्यात येत आहे. या कार्यक्रमासाठी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

## प्रमुख पाहुणे

**मा. ना. श्री. दादाजी भुसे**
पालकमंत्री, नाशिक जिल्हा आणि
सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य

**मा. श्री. शेखर निकम**
आमदार, चिपळूण मतदारसंघ

**मा. ना. श्री. छगन भुजबळ**
अन्नपुरवठा आणि ग्राहक
संरक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य

**मा. श्री. अमरीशभाई पटेल**
आमदार, विधानपरिषद

## कार्यक्रमाचे अध्यक्ष

**मा. श्री. बाळासाहेब थोरात**
(माजी महसूलमंत्री, महाराष्ट्र राज्य)

## विशेष उपस्थिती

**मा. श्री. हेमंत गोडसे** (खासदार, नाशिक)
**मा. सौ. देवयानी फरांदे** (आमदार)
**मा. श्रीमती नीलिमाताई पवार**
**मा. ॲड. माणिकराव कोकाटे** (आमदार)
**मा. डॉ. प्रतापराव वाघ** (मा. खासदार)
**मा. श्री. दिलीपराव बनकर** (आमदार)
**मा. ॲड. राहुल ढिकले** (आमदार)
**मा. डॉ. राहुल आहेर** (आमदार)
**मा. सौ. सीमा हिरे** (आमदार)
**मा. श्री. अनिल कदम** (मा. आमदार)
**मा. श्री. सत्यजित तांबे** (आमदार)

## आपले विनीत

**श्री. अजिंक्य बाळासाहेब वाघ**
(सचिव, स्माईल आणि स्पिनॅच संस्था)

**श्री. समीर बाळासाहेब वाघ**
(अध्यक्ष, के.के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक)

- **वेळ : गुरुवार, दि. १९ ऑक्टोबर २०२३, दुपारी २.०० वाजता**
- **स्थळ : के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे मैदान,**
  हिराबाई हरिदास विद्यानगरी, अमृतधाम, पंचवटी, नाशिक-४२२००३

आपणास ऑनलाइन पद्धतीने सुद्धा ह्या कार्यक्रमास उपस्थित राहता येईल.
**zoom Link : http://bit.ly/JayantiBalasahebWagh91 - Meeting ID : 613 596 0075 Password : 54321**

**Engineering | Agriculture | Polytechnic | Pharmacy | MBA | MCA
Fine & Performing Arts | Colleges of Arts, Commerce, Science &
Computer Science | CBSE & SSC Schools**

पुढारी

# मृदू, सरळमार्गी नेतृत्व कै. बाळासाहेब वाघ



**बाळासाहेब वाघ तथा भाऊ यांनी शिक्षण, सहकार, शेती व सिंचन या क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण योगदान दिले आहे. त्यांनी सामाजिक बांधिलकीचे भान ठेवून, कामकाजात पूर्णपणे झोकून देऊन आणि पारदर्शकतेने ज्या क्षेत्रात काम केले त्या क्षेत्राचे सोने केले. सहकार क्षेत्रात काम करताना त्यांनी रानवड कारखाना उत्तमरीतीने चालविला. जितके दिवस कारखाना चालविला तो शेतकरीहित, तालुका विकास व परिसराच्या कल्याणकारी योजना लक्षात घेऊन चालविला. अशा अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असलेल्या भाऊंच्या स्मृतीस मनापासून वंदन..!**

भाऊ हे नात्याने माझे आतेभाऊ असल्याने काकासाहेबांकडे आमचे लहानपणापासून जाणे-येणे असायचे. शाळेत असताना सुटीत काही दिवस त्यांच्या घरी राहण्याची संधी मिळायची. त्यांच्या घरातील चूल २४ तास सुरू असायची. येणाऱ्या-जाणाऱ्या प्रत्येकाला जेवणाशिवाय गीताई जाऊ देत नसत. भाऊंना मी गुरुस्थानी मानतो आणि स्वत:ला विद्यार्थी समजतो. ते एक आदर्श समाज शिक्षक होते. समाजप्रबोधन करणे हा त्यांचा ध्यास होता. लोकांच्या सहभागातून त्यांनी अनेक जलसिंचन योजना राबविल्या. त्यातून तालुक्याचा विकास साधला. रानवडसारख्या कारखान्याने एकेकाळी आदर्श घालून दिला होता. एक गोष्ट आठवतेय, काकासाहेबांकडे क्रांतिसिंह नाना पाटील यायचे. आम्ही काकासाहेबांकडे सुटीत गेलो अन् नानासाहेब आले की, काकासाहेब आम्हाला आणि आजूबाजूच्या लोकांना रांगेत उभे करायचे. आम्ही रांगेत उभे राहून क्रांतिसिंह नानासाहेबांच्या पाया पडायचो. भाऊही आमच्यासोबत असायचे, अशा अनेक अविस्मरणीय आठवणी आहेत. शिक्षणक्षेत्रात भाऊंचे योगदान उल्लेखनीय आहे. विद्यार्थ्यांसाठी त्यांनी अनेक योजना राबविल्या. प्रत्येक गोष्ट शिस्तबद्ध, न्यायाला प्राधान्य देणारी, अनुशासनाला महत्त्व देणारी होती. जेव्हा माझे त्यांच्यासोबत बोलणे व्हायचे, तेव्हा त्यांच्याकडून नक्कीच काहीतरी शिकायला मिळे.

भाऊंचे कर्तृत्व मोठे असूनही बोलण्यात, वागण्यात मृदुता व नम्रता असे. अभियांत्रिकी शिक्षणाच्या माध्यमातून दर्जावर भर देतानाच त्यांनी तालुक्यातील व जिल्ह्यातील पालकांना सवलती दिल्या. त्यामुळे अनेक होतकरू तरुणांना शिक्षणाची संधी मिळाली. निफाड तालुक्याच्या विकासासाठी भाऊंनी दिलेले योगदान मोठे आहे. सहकार, शिक्षण, संघटन याबरोबरच सिंचन क्षेत्रात भाऊंचा गाढा अभ्यास होता. सिंचन हा त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय होता. त्यांनी अनेक योजना यशस्वीपणे राबविल्या. भाऊंच्या कार्यात सौ. शकुताईंची मोलाची साथ असे. पदवीधर मतदारसंघातून विधान परिषदेत काम करण्याची मला जेव्हा संधी मिळाली, तेव्हा भाऊंचे मार्गदर्शन व सूचना उपयोगी पडल्या. काकासाहेब आणि माझे वडील आबा यांचा निर्मळ स्नेह होता. आबा जोपर्यंत होते तोपर्यंत हे नाते दृढ होते. काकासाहेबांनंतर तोच वसा भाऊंनी पुढे चालविला. समाजानेही त्यांच्या कार्याबाबत कृतज्ञ राहावे.


**- प्रतापदादा सोनवणे,**
माजी खासदार

(टीप :- प्रस्तुत लेख हा 'कर्मधुरंधर बाळासाहेब वाघ : कार्य आणि कर्तृत्व' या गौरव ग्रंथातून घेण्यात आला आहे.)

पुढारी

## के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक,
## स्माईल व स्पिनॅच संस्था
## यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित

प्रेरणास्थान



कर्मवीर कै. देवराम सयाजी वाघ

## कै. बाळासाहेब देवराम वाघ (भाऊ)



# ९१ वी जयंती कार्यक्रम

जयंती निमित्त... कोटी–कोटी प्रणाम!

के.के. वाघ शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष व महाराष्ट्रातील विनाअनुदानीत अभियांत्रिकी, तंत्रनिकेतने, कृषी व कृषी संलग्न महाविद्यालये या तीनही असोसिएशनचे माजी अध्यक्ष, द्रष्टे ज्ञानयोगी, उच्च व तंत्रशिक्षणामध्ये क्रांती करणारे तसेच दर्जा, मुल्य व नैतिक परंपरा यांचा अहोरात्र ध्यास धरणारे उत्तुंग व्यक्तिमत्व ! ह्या महनीय कर्मयोग्याची ९१ वी जयंती साजरी करण्यात येत आहे. या कार्यक्रमासाठी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

### प्रमुख पाहुणे

**मा. ना. श्री. दादाजी भुसे**
पालक मंत्री, नाशिक जिल्हा आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य

**मा. ना. श्री. छगन भुजबळ**
अन्नपुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य

**मा. श्री. शेखर निकम**
आमदार, चिपळुण मतदार संघ

**मा. श्री. अमरीशभाई पटेल**
आमदार, विधान परिषद

### कार्यक्रमाचे अध्यक्ष

**मा.श्री. बाळासाहेब थोरात** (माजी महसुल मंत्री, महाराष्ट्र राज्य)

### विशेष उपस्थिती

- **मा.श्री. हेमंत गोडसे** (खासदार, नाशिक)
- **मा.सौ. देवयानी फरांदे** (आमदार)
- **मा.श्रीमती निलीमाताई पवार**
- **मा.ॲड. माणिकराव कोकाटे** (आमदार)
- **मा.डॉ. प्रतापराव वाघ** (मा.खासदार)
- **मा.श्री. दिलीपराव बनकर** (आमदार)
- **मा.ॲड. राहुल ढिकले** (आमदार)
- **मा.डॉ. राहुल आहेर** (आमदार)
- **मा.सौ. सीमा हिरे** (आमदार)
- **मा.श्री. अनिल कदम** (मा.आमदार)
- **मा.श्री. सत्यजित तांबे** (आमदार)

### आपले विनित

**श्री. अजिंक्य बाळासाहेब वाघ**
(सचिव, स्माईल आणि स्पिनॅच संस्था)

**श्री. समीर बाळासाहेब वाघ**
(अध्यक्ष, के.के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक)

- **वेळ** : गुरुवार, दि. १९ ऑक्टोबर २०२३, दुपारी २.०० वाजता
- **स्थळ** : के.के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे मैदान,
  हिराबाई हरिदास विद्यानगरी, अमृतधाम, पंचवटी, नाशिक–४२२००३.

आपणास ऑनलाईन पध्दतीने सुध्दा ह्या कार्यक्रमास उपस्थित राहता येईल.

**Zoom Link:** http://bit.ly/JayantiBalasahebWagh91 - **Meeting ID:** 613 596 0075 **Password:** 54321

**Engineering | Agriculture | Polytechnic | Pharmacy | MBA | MCA | Fine & Performing Arts | Colleges of Arts, Commerce, Science & Computer Science | CBSE & SSC Schools**

My Nashik Edition
Oct 19, 2023 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# बाळासाहेब वाघ यांची आज ९१ वी जयंती

**नाशिक** : के. के. वाघ शिक्षण संस्थेचे संस्थापक दिवंगत बाळासाहेब वाघ यांची आज (१९ ऑक्टोबर) ९१ वी जयंती असून, या निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. आज दुपारी २ वाजता संस्थेच्या के. के. वाघ इंजिनीअरिंग कॉलेजच्या मैदानावर हा कार्यक्रम होणार आहे.बाळासाहे वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली के. के. वाघ शिक्षण संस्थेने विविध महाविद्यालयांची उभारणी केली. ते राज्यातील विनाअनुदानित अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन तसेच कृषी व कृषी संलग्न महाविद्यालये असोसिएशनचे अध्यक्षही होते. शिक्षण क्षेत्रातील विविध समस्या दूर करण्यासाठी त्यांना पुढाकार घेऊन प्रयत्न केला. त्यांच्या ९१ व्या जयंतीनिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून पालकमंत्री दादा भुसे, अन्न पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, आमदार शेखर निकम, आमदार अमरीश पटेल उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात असणार आहेत. याचसोबत खासदार हेमंत गोडसे, आमदार देवयानी फरांदे, राहुल ढिकले, राहुल आहेर, सीमा हिरे, ॲड. माणिक कोकाटे, सत्यजीत तांबे, दिलीप बनकर आदी उपस्थित राहतील.

संयोजन केले. येणार आहे. विद्यार्थी सेनेतर्फे निवेदन देऊन करण्यात देण्यात आला.

## के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक,
## स्माईल व स्पिनॅच संस्था
## यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित
## कै. बाळासाहेब देवराम वाघ (भाऊ)

प्रेरणास्थान



कर्मवीर कै. देवराम सयाजी वाघ



# ९१ वी जयंती कार्यक्रम

जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम!

के. के. वाघ शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष व महाराष्ट्रातील विनाअनुदानीत अभियांत्रिकी, तंत्रनिकेतने, कृषी व कृषी संलग्न महाविद्यालये या तीनही असोसिएशनचे माजी अध्यक्ष, द्रष्टे ज्ञानयोगी, उच्च व तंत्रशिक्षणामध्ये क्रांती करणारे तसेच दर्जा, मूल्य व नैतिक परंपरा यांचा अहोरात्र ध्यास धरणारे उत्तुंग व्यक्तिमत्त्व! या महनीय कर्मयोग्याची ९१ वी जयंती साजरी करण्यात येत आहे. या कार्यक्रमासाठी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

### प्रमुख पाहुणे

**मा. ना. दादाजी भुसे**
पालकमंत्री, नाशिक जिल्हा आणि
सार्वजनिक बांधकाममंत्री, महाराष्ट्र राज्य

**मा. ना. छगन भुजबळ**
अन्नपुरवठा आणि ग्राहक
संरक्षणमंत्री, महाराष्ट्र राज्य

**मा. श्री. शेखर निकम**
आमदार, चिपळूण मतदारसंघ

**मा. श्री.अमरीशभाई पटेल**
आमदार, विधान परिषद

### कार्यक्रमाचे अध्यक्ष

**मा. श्री. बाळासाहेब थोरात** (माजी महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य)

### विशेष उपस्थिती

मा. श्री. हेमंत गोडसे (खासदार, नाशिक)
मा. सौ. देवयानी फरांदे (आमदार)
मा. श्रीमती नीलिमाताई पवार
मा. ॲड. माणिकराव कोकाटे (आमदार)
मा. डॉ. प्रतापराव वाघ (मा. खासदार)
मा. श्री. दिलीपराव बनकर (आमदार)
मा. ॲड. राहुल ढिकले (आमदार)
मा. डॉ. राहुल आहेर (आमदार)
मा. सौ. सीमा हिरे (आमदार)
मा. श्री. अनिल कदम (मा. आमदार)
मा. श्री. सत्यजित तांबे (आमदार)

### आपले विनित

**श्री. अजिंक्य बाळासाहेब वाघ**
(सचिव, स्माईल आणि स्पिनॅच संस्था)

**श्री. समीर बाळासाहेब वाघ**
(अध्यक्ष, के.के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक)

- वेळ : गुरुवार, दि. १९ ऑक्टोबर २०२३, दुपारी २.०० वाजता
- स्थळ : के.के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे मैदान,
  हिराबाई हरिदास विद्यानगरी, अमृतधाम, पंचवटी, नाशिक-४२२००३.

आपणास ऑनलाईन पद्धतीनेसुद्धा या कार्यक्रमास उपस्थित राहता येईल.

**Zoom Link** : http://bit.ly/JayantiBalasahebWagh91 | **Meeting ID** : 613 596 0075 | **Passward** : 54321

**Engineering | Agriculture | Polytechnic | Pharmacy | MBA | MCA**
**Fine & Performing Arts | Colleges of Arts, Commerce, Science & Computer Science**
**CBSE & SSC Schools**

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

जयंतीनिमित्त...
कोटी-कोटी प्रणाम!



कै. बाळासाहेब देवराम वाघ

प्रेरणास्थान



## के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक,
## स्माईल व स्पिनॅच संस्था
## यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित

# कै. बाळासाहेब देवराम वाघ (भाऊ)

### ९१ वी जयंती कार्यक्रम

के. के. वाघ शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष व महाराष्ट्रातील विनाअनुदानीत अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन, कृषी व कृषी संलग्न महाविद्यालये या तीनही असोसिएशनचे माजी अध्यक्ष, द्रष्टे ज्ञानयोगी, उच्च व तंत्रशिक्षणामध्ये क्रांती करणारे तसेच दर्जा, मूल्य व नैतिक परंपरा यांचा अहोरात्र ध्यास धरणाऱ्या उत्तुंग व्यक्तीमत्व या महनीय कर्मयोग्याची ९१ वी जयंती साजरी करण्यात येत आहे.
या कार्यक्रमासाठी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

**प्रमुख पाहुणे**

**मा. ना. दादाजी भुसे**
पालकमंत्री, नाशिक जिल्हा आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य

**मा.ना.श्री. छगन भुजबळ**
अन्नपुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य

**मा. श्री. शेखर निकम**
आमदार, चिपळुण मतदार संघ

**मा. श्री. अमरीशभाई पटेल**
आमदार, विधान परिषद

**कार्यक्रमाचे अध्यक्ष**

**मा. श्री. बाळासाहेब थोरात,** माजी महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य

**विशेष उपस्थिती**

मा. श्री. हेमंत गोडसे, (खासदार, नाशिक)
मा. सौ. देवयानी फरांदे, (आमदार)
मा. श्रीमती नीलिमाताई पवार
मा. ॲड. माणिकराव कोकाटे, (आमदार)
मा. डॉ. प्रतापराव वाघ (मा. खासदार)
मा. श्री. दिलीपराव बनकर, (आमदार)
मा. ॲड. राहुल ढिकले (आमदार)
मा. डॉ. राहुल आहेर, (आमदार)
मा. सौ. सीमा हिरे, (आमदार)
मा. श्री. अनिल कदम (मा. आमदार)
मा. श्री. सत्यजित तांबे, (आमदार)

**आपले विनित**

**मा.श्री. अजिंक्य बाळासाहेब वाघ**
(सचिव, स्माईल आणि स्पिनॅच संस्था)

**मा.श्री. समीर बाळासाहेब वाघ**
(अध्यक्ष, के.के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक)

- वेळ : गुरुवार, दि. १९ ऑक्टोबर २०२३, दुपारी २.०० वाजता
- स्थळ : के.के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे मैदान,
  हिराबाई हरिदास विद्यानगरी, अमृतधाम, पंचवटी, नाशिक-४२२००३.

आपणास ऑनलाईन पद्धतीने सुद्धा या कार्यक्रमास उपस्थित राहता येईल.

Zoom Link : http://bit.ly/jayantiBalasahebWagh91 - Meeting ID : 6135960075 Password : 54321

**Engineering | Agriculture | Pharmacy | Polytechnic | MBA | MCA | Fine & Performing Arts | College of Arts, Commerce, Science & Computer Science | CBSE & SSC Schools**

# कर्मयोगी : कै. बाळासाहेब वाघ..!

**स्वातंत्र्यपूर्वीच्या काळात सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक गुलामगिरीविरुध्द निर्भयपणे बंडाचे निशाण खांद्यावर मिरविणाऱ्या काकासाहेबांच्या घरात रोज घडणाऱ्या स्थित्यंतराचा परिणाम सर्वात जास्त त्यांच्या कुटुंबावर होत होता. रोज नवनवीन संकटाला ह्या घराला, त्यात राहणाऱ्या प्रत्येकाला सामोरे जावे लागत होते. काकासाहेबांच्या कारकीर्दीत अशोकस्तंभाजवळील हनुमान घाटावर असलेला 'वाघ बंगला' म्हणजे या चळवळींचे प्रमुख केंद्र होते. कै. बाळासाहेब वाघ यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या आठवणींना उजाळा देणारा हा लेख.**

नानाविध क्षेत्रातील भाऊराव पाटील, मधू लिमये, केशवराव जेधे, नानासाहेब पाटील, रावसाहेब थोरात या मान्यवरांचा कायमच घरात राबता असायचा. मामा हे तेथील स्वयंस्फूर्त स्वयंसेवकच होते. प्रत्यक्ष अनुभव व मिळालेल्या सहवासामुळे हे घर सुसंस्कृत झाले. त्यात भाऊमामांची निरीक्षण व आकलनशक्ती इतकी अफाट होती की, त्यांनी अनेक चांगले संस्कार घेतले. एकदा तर भाऊराव पाटील तेथे आठ दिवस मुक्कामी होते तेव्हा साहजिकच त्यांची सर्व कामे भाऊमामांनी केली होती. मोठ्या लोकांच्या सहवासामुळेच ते निरलस, निरपेक्ष, निस्वार्थीपणे सेवा देत राहिले. काकासाहेब भूमिगत झाले अन् कळत-नकळत लहानपणापासूनच भाऊमामांना वडिलकीची भूमिका निभवावी लागली, ती कायमचीच... काकांची वैचारिक श्रीमंती व बाईंची स्थितप्रज्ञता हे दोन्ही संस्कार मामांमध्ये सारखेच वाढीला लागले आणि आजपर्यंत तो आलेख त्यांच्या जीवनभर वाढतच राहिला.

सुट्टीत आम्ही पाच-पन्नास नातवंडे नाशिकला एकाचवेळी आजोळी जमायचो. त्यावेळी आम्हाला सांभाळायची जबाबदारी भाऊमामांकडेच असायची. मितभाषी मामांचा दरारा आम्हाला अजूनही अंगावर काटा आणतो. तेव्हा कदाचित वेळप्रसंगी आम्हाला राग आला असेल किंवा वाईटही वाटले असेल पण आज प्रत्यक्षपणे बघताना असे लक्षात येते की, 'आपले ते बाळ अन् दुसऱ्याचे ते कार्टं' ही वृत्ती मामांमध्ये कधीच नव्हती. आमच्यापैकी चुकून कुणी खोटे बोलले की, सर्वांसमोर त्याला इतके ठोकणार की काय बिशाद आहे त्याची आयुष्यभर खोटे बोलण्याची! आम्ही लहानपणी बाहेर फिरायला गेलो अन् संध्याकाळी उशीर झाला की, मामांचा मार खायची तयारी ठेवावीच लागायची. मामांच्या लहान अन् मोठ्या बहिणीसुध्दा त्यांना खूप घाबरत असत. तिथे आम्हा भाच्यांची काय कथा! पण त्यामुळेच सकारात्मक आचार-विचारांचा संस्कार कळत-नकळत आमच्यावर झाला.

एक वेगळा प्रसंग मला येथे सांगावासा वाटतो. एकेकाळी वैभवशाली असलेल्या वाघ कुटुंबाला दरम्यानच्या काळात उतरती कळा आली तेव्हा भाऊ प्रत्यक्ष शेतीवर आले. त्यांनी स्वतःहून घराची जबाबदारी उचलली. मोठे मामा, स्वतःचे कुटुंब आणि आजीसह असणारे धाकटे मामा व नाशिकचे घर ही तीनही कुटुंबे त्यांनी काही काळ चालविली. त्यांनी या संदर्भात कधीही कोणाला सांगितले नाही. मी घरात मोठी असल्याने मला हे माहीत झालं. या तीनही घरी ते पैसे पुरवत. हा त्यांच्या मनाचा थोरपणाच म्हणावा लागेल. त्यांनी स्वतःचे कौतुक कधीही केले नाही. मदत केली हे कोणाजवळच बोलून दाखविले नाही. आणि केलेल्या मदतीची परतफेड होईल, अशी अपेक्षाही केली नाही. उलट ते माझे कर्तव्यच होते, ही त्यांची भावना होती. आईही त्यांच्या आदरस्थानी होती.

एक ध्येयवेडा माणूस म्हणून आम्ही त्यांच्याकडे पाहत आलो. सध्या हयात असलेल्या सर्व सामाजिक व्यक्तिमत्त्वांमध्ये मी आदर्शाची जागा माझ्या भाऊमामांनाच देते. त्यांना वाचनाची खूप आवड होती. आयुष्याच्या शेवटपर्यंत ते सातत्याने वाचत राहीले. त्यांनी उभारलेले कोणतेही महाविद्यालय असो तेथे पुस्तकांचा संग्रह मोठ्या प्रमाणात असतो. कोणतेही काम करताना त्यांची तल्लीनता इतकी होती की तेथील बारीकसारीक तपशील केवळ आणि केवळ त्यांनाच माहीत असायचे. संस्थेच्या आवारातील प्रत्येक वीट ह्या विश्वकर्म्याला ओळखते. संस्थेसाठी मोठ्या निष्ठेने, निरपेक्ष भावनेने ते कार्य करीत राहीले. मामांची राहणी इतकी साधी होती की, 'एक होता कार्व्हर' या पुस्तकातील कार्व्हरची तीव्रतेने आठवण व्हायची. मंजिरीच्या लग्नानिमित्त मी त्यांना केळवणाचं आमंत्रण दिले. आमंत्रण पटकन स्वीकारले तर ते मामा कसले. मी म्हटले बरं केळवण नाही सहजच तुमच्या मित्रांबरोबर जेवायला या. हो तर म्हटले पण मी आहेर काहीच घेणार नाही ह्या अटीवर! चुकीच्या प्रथा मोडता येतील तेवढ्या स्वतःपुरत्या तरी ते मोडतच गेले, आजही मोडत आहेत. एवढेच नव्हे तर ते सुरुवातीच्या काळात संजीवनी सहकारी साखर कारखान्यात असताना बहिणीकडे म्हणजे माईकडे होते. तेव्हा तेथेही ते कधी मोकळेपणाने वागले आणि जेवले नाहीत. त्यांना स्वतःच्या बहिणीकडेही सतत अवघडल्यासारखे वाटायचे. इतके ते स्वावलंबी व साधे होते. आपल्यामुळे कोणालाही त्रास होऊ नये ही त्यांची वृत्ती होती. त्यांची 'साधी राहणी अन् उच्च विचारसरणी' त्यांच्या वर्तनातून व कामातून लक्षात येते.

मामांचे लग्न आळंदी ह्या तीर्थक्षेत्री झाले. मामांनी स्वतः साठीही बऱ्याच मुली पाहिल्या. पण त्यांच्या पसंतीला कोणी सहजासहजी उतरेना. शेवटी मामांनी चोकसपणे शकुमामींची निवड केली होती. आणि साधेपणाने त्यांच्याशी लग्न केले होते. मला वाटते, सरस्वतीच्या मंदिराचे हे पुजारी त्यांचा 'मीपणा' केव्हाच ज्ञानेश्वरचरणी ठेऊन आले असावेत. कुठलाही गर्व नाही. मी हे केले, मी ते केले अशी शेखी मिरवणे नाही, कुणाच्याही पुढे पुढे करणे त्यांच्या स्वभावात नव्हते. अशी जगावेगळी माणसे पाहिली की उगाचच वाटायला लागते की, जगाला ह्यांची किंमत कळणार तरी कधी !

मामा-मामींचा प्रपंच- प्रवास खूपच खडतर झाला. मामा मात्र संताप्रमाणे हळूहळू सारीच जबाबदारी

Divya Marathi 18-10-2023

होते.

जयंतीनिमित्त...
कोटी-कोटी प्रणाम!



कै. बाळासाहेब देवराम वाघ

प्रेरणास्थान



कर्मवीर कै. देवराम सयाजी वाघ

## के. के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक, स्माईल व स्पिनॅच संस्था यांचे संयुक्त विद्यमाने आयोजित

# कै. बाळासाहेब देवराम वाघ (भाऊ)

## ९१ वी जयंती कार्यक्रम

के. के. वाघ शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष व महाराष्ट्रातील विनाअनुदानीत अभियांत्रिकी, तंत्रनिकेतन, कृषी व कृषी संलग्न महाविद्यालये या तीनही असोसिएशनचे माजी अध्यक्ष, द्रष्टे ज्ञानयोगी, उच्च व तंत्रशिक्षणामध्ये क्रांती करणारे तसेच दर्जा, मूल्य व नैतिक परंपरा यांचा अहोरात्र ध्यास धरणाऱ्या उत्तुंग व्यक्तीमत्व या महनीय कर्मयोग्याची ९१ वी जयंती साजरी करण्यात येत आहे.
या कार्यक्रमासाठी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

### प्रमुख पाहुणे

**मा. ना. दादाजी भुसे**
पालकमंत्री, नाशिक जिल्हा आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री, महाराष्ट्र राज्य

**मा.ना.श्री. छगन भुजबळ**
अन्नपुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य

**मा. श्री. शेखर निकम**
आमदार, चिपळुण मतदार संघ

**मा. श्री. अमरीशभाई पटेल**
आमदार, विधान परिषद

### कार्यक्रमाचे अध्यक्ष

**मा. श्री. बाळासाहेब थोरात,** माजी महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य

### विशेष उपस्थिती

मा. श्री. हेमंत गोडसे, (खासदार, नाशिक)
मा. सौ. देवयानी फरांदे, (आमदार)
मा. श्रीमती नीलिमाताई पवार
मा. ॲड. माणिकराव कोकाटे, (आमदार)
मा. डॉ. प्रतापराव वाघ (मा. खासदार)
मा. श्री. दिलीपराव बनकर, (आमदार)
मा. ॲड. राहुल ढिकले (आमदार)
मा. डॉ. राहुल आहेर, (आमदार)
मा. सौ. सीमा हिरे, (आमदार)
मा. श्री. अनिल कदम (मा. आमदार)
मा. श्री. सत्यजित तांबे, (आमदार)

### आपले विनित

**मा.श्री. अजिंक्य बाळासाहेब वाघ**
(सचिव, स्माईल आणि स्पिनॅच संस्था)

**मा.श्री. समीर बाळासाहेब वाघ**
(अध्यक्ष, के.के. वाघ शिक्षण संस्था, नाशिक)

- **वेळ :** गुरुवार, दि. १९ ऑक्टोबर २०२३, दुपारी २.०० वाजता
- **स्थळ :** के.के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे मैदान, हिराबाई हरिदास विद्यानगरी, अमृतधाम, पंचवटी, नाशिक-४२२००३.

आपणास ऑनलाईन पद्धतीने सुद्धा या कार्यक्रमास उपस्थित राहता येईल.

Zoom Link : http://bit.ly/jayantiBalasahebWagh91 - Meeting ID : 6135960075 Password : 54321

**Engineering | Agriculture | Pharmacy | Polytechnic | MBA | MCA | Fine & Performing Arts | College of Arts, Commerce, Science & Computer Science | CBSE & SSC Schools**

# कै. बाळासाहेब वाघ यांची १९ रोजी जयंती

नाशिक : प्रतिनिधी



के. के. वाघ शिक्षण संस्था, स्माईल व स्पिनॅच संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने के. के. वाघ शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष कै. बाळासाहेब (भाऊ) देवराम वाघ यांची ९१ वी जयंती कार्यक्रम गुरुवार, १९ रोजी दुपारी ठीक २ वाजता के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आला आहे. तसेच झुम या ऑनलाइन प्लॅटफॉर्मद्वारे मीटिंग आयडी- ६१३ ५९६ ००७५ व पासवर्ड- ५४३२१ कार्यक्रमाचे प्रक्षेपण केले जाणार आहे. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाराष्ट्र राज्याचे माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात हे भूषविणार आहेत. तसेच नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री ना. दादाजी भुसे, अन्न व पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री ना. छगन भुजबळ, चिपळूणचे आमदार शेखर निकम, विधान परिषदेचे आमदार अमरीश पटेल हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्याचप्रमाणे विशेष उपस्थिती म्हणून खा. हेमंत गोडसे, माजी खासदार डॉ. प्रतापराव वाघ, मविप्रच्या माजी सरचिटणीस नीलिमाताई पवार, आमदार डॉ. राहुल आहेर, आमदार देवयानी फरांदे, आमदार दिलीप बनकर, आमदार सीमा हिरे, आमदार ॲड. राहुल ढिकले, माजी आमदार अनिल कदम, आमदार ॲड. माणिकराव कोकाटे, आमदार सत्यजित तांबे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे शुक्रवारी राष्ट्रीय सुरक्षेवर व्याख्यान

**नाशिक** । के. के. वाघ संस्थेतर्फे शुक्रवारी (दि.२७) सायंकाळी शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी सभागृह, गंगापूर रोड, नाशिक येथे राष्ट्रीय सुरक्षेवर व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. दिवंगत बाळासाहेब वाघ यांच्या स्मृतीप्रित्यर्थ हे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

के. के. वाघ शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब वाघ यांचे ६ फेब्रुवारी २०२२ रोजी निधन झाले. शिक्षण, सहकार, साहित्य, संस्कृती, संगीत, लोककला, क्रीडा अशा विविध क्षेत्रात त्यांचे योगदान मोलाचे आहे. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ विविध क्षेत्रांतील मान्यवरांना आमंत्रित केले जाते. या उपक्रमाचे सहावे पुष्प आहे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून एअर चीफ मार्शल (निवृत्त) भूषण गोखले हे गुंफणार आहेत. ते राष्ट्रीय सुरक्षा: आव्हाने व संधी या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्हाईस ॲडमिरल (निवृत्त) सुनील भोकरे हे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास नाशिककरांनी उपस्थित राहावे, असे आवाहन वाघ संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

## महत्त्वाचे

# शुक्रवारी के. के. वाघ शिक्षण संस्थेतर्फे राष्ट्रीय सुरक्षेवर व्याख्यान

**नाशिक :** के. के. वाघ शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष कै. बाळासाहेब वाघ यांचे ६ फेब्रुवारी २०२२ रोजी निधन झाले. शिक्षण, सहकार, साहित्य, संस्कृती, संगीत, लोककला, क्रीडा अशा विविध क्षेत्रांत त्यांचे योगदान मोलाचे आहे. त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ विविध क्षेत्रांतील मान्यवरांना आमंत्रित केले जात असते. या उपक्रमाचे सहावे पुष्प शुक्रवार, दि. २७ ऑक्टोबर २०२३ रोजी शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी सभागृह, गंगापूर रोड, नाशिक येथे सायंकाळी ५.३० वाजता आयोजित केलेले आहे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून एअर चीफ मार्शल (रिटायर्ड) मा. भूषण गोखले हे गुंफणार आहेत. राष्ट्रीय सुरक्षा : आव्हाने व संधी या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी व्हाइस ॲडमिरल (रिटायर्ड) सुनील भोकरे हे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास नाशिककरांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.